



# पारनेर दर्शन







वर्ष १ अंक २८४, मंगळवार ३० जुलै २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# राजे शिवाजी पतसंस्थेच्या संचालक मंडळाविरोधात गुन्हा दाखल

## आझाद ठुबे, व्यवस्थापकासह १२ संचालकांचा समावेश

पारनेर : प्रतिनिधी

**कोट्यावधी रूपयांच्या गैरव्यवहारामुळे अडचणीत सापडलेल्या कान्हूरपठार येथील राजे शिवाजी पतसंस्थेचा चेअरमन, जिल्हा परिषदेचा माजी सदस्य आझाद प्रभाकर ठुबे, व्यवस्थापक संभाजी सिताराम भालेकर याच्यासह संस्थेच्या १२ संचालकांविरोधात पारनेर पोलीस ठाण्यात सोमवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**









यासंदर्भात बाळासाहेब तुकाराम वाळुंज वय ५० रा. काकणेवाडी, ता. पारनेर यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीमध्ये नमुद करण्यात आले आहे की, वाळुंज यांचे राजे शिवाजी पतसंस्थेच्या कान्हूरपठार व टाकळी ढोकेश्वर शाखांमध्ये बचत खाते असून टाकळी ढोकेश्वर येथील खात्यामध्ये १ लाख १९ हजार ६२७ इतकी रक्कम आहे तर प्रत्येकी १ लाख रूपये रकमेच्या ९ मुदत ठेव पावत्या आहेत. खात्यावरील रक्कम तसेच मुदत ठेव पावत्यांची मुदत संपल्यानंतर रकमेची मागणी करण्यात आल्यानंतर रक्कम देण्यास टाळाटाळ करण्यात आल्याचे फिर्यादीमध्ये नमुद करण्यात आले आहे.

### गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन दिले

वाळुंज यांनी या पतसंस्थेमध्ये १३ महिने मुदतीच्या दराने दर साल दर शेकडा १०.२५ टक्के व्याज दराने १ लाख रूपये रकमेच्या ९ पावत्या केल्या होत्या. मुदतीनंतर ठेवींची रक्कम मिळवी यासाठी वेळोवेळी मागणी करण्यात आली असता रक्कम देण्यास टाळाटाळ करण्यात आली. त्यामुळे वाळुंज यांना उदरनिर्वाह चालविणे अवघड झाले आहे. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी वेळोवेळी प्रलोभने दाखवून गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन दिल्याचे फिर्यादीत नमुद करण्यात आले आहे.

### इतर ठेवीदरांच्याही ठेवी अडकल्या

वाळुंज यांच्याप्रमाणेच सुर्यभान सोन्याबापू मेहेत्रे, गोविंद रामभाऊ पवार, पोपट अवडाजी भालेकर, तान्हाजी भानुदास खोडदे, रघुनाथ ज्ञानदेव खोडदे व इतर अनेक ठेवीदरांनी पतसंस्थेकडे ठेवलेल्या ठेवींची मुदत पुर्ण झाल्यानंतर रकमेची मागणी केली परंतू त्यांनाही रक्कम मिळू शकली नाही असेही या फिर्यादीत नमुद करण्यात आले आहे.

### ६० ते ७० कोटींचे विनातारण कर्ज

पतसंस्थेचा चेअरमन आझाद ठुबे तसेच संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संगनमताने पतसंस्थेकडून ६० ते ७० कोटी रूपयांचे कर्ज विना तारण व कोणत्याही कागदपत्रांची पुर्तता न करता संचालकांच्या नातेवाईकांना दिले आहे. कर्ज थकीत होऊनही या कर्जाचा भरणा न केल्याने ठेवीदारांना ठेवीची, बचत खात्यावरील रक्कम मिळत नसल्याचे वाळुंज यांनी फिर्यादीमध्ये नमुद केले आहे.

### हे आहेत आरोपी

आझाद प्रभाकर ठुबे, शमशुददीन गुलाबभाई इनामदार व्हा. चेअरमन, उदयकुमार बळवंत सोनावळे, विजय दिनकर काकडे, संतोष गुलाब ठुबे, भाऊसाहेब बबन नवले, प्रमोद नारायण लोंढे, संतोष पोपटलाल कोठारी, किशोर दिपक शिंदे, साहेबराव किसन जेजुरकर, ज्योती तुषार ठुबे, सारीका भास्कर पोपळघट सर्व संचालक, संभाजी सिताराम भालेकर कार्यकारी संचालक सर्व रा. कान्हूरपठार, भगवंत उर्फ नंदकुमार चंद्रकांत ठुबे रा. अहमदनगर.

### या कलमांन्वये झालाय गुन्हा दाखल

**भारतीय न्यास संहीता ४०९**

जो कोणी सार्वजनिक सेवक म्हणून किंवा त्याच्या व्यवसायाच्या मार्गाने, बॅंकर, व्यापारी, घटक, दलाल, वकील किंवा एजंट म्हणून कोणत्याही प्रकारे मालमत्तेवर किंवा मालमत्तेवर कोणतेही वर्चस्व सोपविलेले असेल तर विश्वासार्हतेचे गुन्हेगारी उल्लंघन करतो.

**भारतीय दंड संहिता ४२०**

जो कोणी फसवणूक करतो आणि त्याद्वारे अप्रामाणिकपणे फसवलेल्या व्यक्तीला कोणतीही मालमत्ता कोणत्याही व्यक्तीला देण्यास किंवा मौल्यवान सुरक्षितेचा संपूर्ण कोणताही भाग, किंवा स्वाक्षरी केलेली कोणतीही गोष्ट बनविणे, बदलणे, किंवा नष्ट करणे.

**आयपीसी ३४**

जेंव्हा सर्वांच्या समान हेतूने अनेक व्यक्तींद्वारे गुन्हेगारी कृत्य केले जाते, तेंव्हा अशा प्रत्येक व्यक्तीला त्या कृत्यासाठी जबाबदार धरले जाते जसे की ते एकटयाने केले असेल.

**MPID**

महाराष्ट्र वित्तीय संस्थांमधील ठेवीदारांच्या हितसबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ मधील कलम ३

### उपनिबंधक कार्यालयाकडून चौकशी

संस्थेकडून ठेवींची रक्कम मिळण्यास टाळाटाळ होऊ लागल्यानंतर सहाय्यक निबंधक, जिल्हा उपनिबंधक यांच्याकडे तक्रार अर्ज करण्यात आला. या संस्थेची उपनिबंधकांच्या ऑडीट विभागाने चौकशी सुरू केली असल्याचे सांगण्यात आल्याचे फिर्यादीत नमुद करण्यात आले आहे.

# साहेबाचा सांगावा, अवैध धंदे बंद ठेवा!

## पोलीस अधीक्षकांच्या आदेशानंतर कलेक्टरचे संदेश

पारनेर : प्रतिनिधी

**खासदार नीलेश लंके यांनी चार दिवस पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण करून नगर पोलीस दलातील भ्रष्टाचार चव्हाटयावर आल्यानंतर पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी सर्व अवैध धंदे बंद करण्याच्या सक्त सुचना प्रत्येक पोलीस ठाण्याच्या प्रभारींना दिल्यानंतर पारनेर तसेच सुपा पोलीस ठाण्याच्या कलेक्टरांनी अवैध धंदे बंद ठेवण्याचा साहेबाचा सांगावा असल्याचा संदेश अवैध व्यावसायिकांना दिला.**



कलेक्टरच्या संदेशानंतर अवैध व्यावसायिकांनी आपले व्यवसाय बंद केले असले तरी काहींनी चोरून लपून हे उद्योग सुरूच ठेवल्याची माहीती पुढे आली आहे. तालुक्यात बिंगो, जुगार, मटका, चिमणी पाखरं, अवैध वाळू उपसा व वाहतूक, बेकायदेशिर दारू विक्री, चंदन तसेच स्टील तस्करी आदी व्यवसाय मोठया जोमात सुरू होते. खासदार नीलेश लंके यांनी पोलीस दलातील हप्तेखोरीचे रेट कार्ड जारी करीत हा भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणल्यानंतर नगर जिल्हयाचे पोलीस दल हादरले. खा.लंके यांच्यापर्यंत पोलीस दलातील हप्तेखोरीची इत्यंभूत माहिती कोणी दिली यासाठी चाचपणी सुरू झाली असून ही माहीती पुरविणारांना सोडणार नाही अशी धमकीच पोलीस अधिक्षक ओला यांनी दिल्याची माहीती आहे.

पोलीस अधिक्षकांनी विविध पोलीस ठाण्याच्या प्रभारींची बैठक घेऊन अवैध व्यवसायांवर कारवाई करा, ज्या प्रभारींच्या कार्यक्षेत्रात अवैध व्यवसाय सुरू असल्याचे आढळून येईल त्या प्रभारीवर कारवाई करण्यात येईल अशी तंबीही देण्यात आली होती. त्यामुळे सर्वच पोलीस ठाण्याच्या प्रभारींनी आपआपल्या कलेक्टरांना सर्व अवैध व्यावसायिकांना साहेबाचा सांगावा पोहोच केला आहे.

### कर्जाचा हप्ता ५० हजार, पोलीसांचा ६५ हजार !

अनेक तरूण डंपर, ट्रक कर्जावर घेऊन वाळूची तस्करी करतात. सध्या महसूल विभागाने तस्करीविरोधात कठोर निर्णय घेतला असला तर वाळूची तस्करी काही बंद नाही. वाळू तस्करीवरील निर्बंधाचे कारण पुढे करून पोलीसांकडून एका वाहनामागे ६५ हजारांचा हप्ता वसुल करण्यात येत असल्याची धक्कादायक माहीती एका वाळू तस्कराने दिली. वाहनाच्या कर्जाचा हप्ता ५० हजार तर पोलीसांना ६५ हजार देऊन माझ्या हाती केवळ २५ ते ३० हजार राहतात. मग जोखीम पत्करून हा व्यवसाय करून उपयोग तरी काय असा सवाल या तरूणाने केला.

### कला केंद्र चालकांना कोणाचे अभय?

महाराष्ट्राची लोककला जिवंत ठेवण्यासाठी पारंपारीक वेश परीधान करून तरूणींची नाच गाणी व्यासपीठावर सादर करण्यासाठी शासनाने परवानगी दिलेली आहे. असे असताना तालुक्यात स्वतंत्र खोल्यांमध्ये ही नाचगाणी बिनदिक्तपणे सुरू आहेत. अशा कला सादरीकरणास नेमके कोणाचे अभय आहे असा सवाल या निमित्ताने करण्यात येत आहे.

# सपोनी दंडगव्हाण, मुजावर तसेच उपनिरीक्षक मारक पारनेरला

## पोलीस अधीक्षकांचे आदेश

नगर : प्रतिनिधी

**सहाय्यक पोलीस निरीक्षक अभय दंडगव्हाळ व जुबेर मुजावर तसेच पोलीस उपनिरीक्षक रणजीत मारक यांच्या पारनेर पोलीस ठाण्यात बदल्या करण्यात आल्या आहेत. पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी जिल्हयातील व जिल्हयाबाहेरून आलेल्या पोलीस अधिकाऱ्यांची पदस्थापना केली आहे.**




सहाय्यक पोलीस निरीक्षक अभय दंडगव्हाळ जिल्हयात नव्याने बदलून आलेले आहेत तर उपनिरीक्षक रणजीत मारक यांची नगर तालुका पोलीस ठाण्यातून पारनेर येथे बदली करण्यात आली आहे. इतर अधिकाऱ्यांमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक जुबेर अहमद मुजावर तोफखाना नगर ते पारनेर, उपनिरीक्षक रोहिदास ठोंबरे कोपगांव शहर ते श्रीरामपूर शहर, किरण साळुंके भिंगार उर्वरीत पान ३ वर

# मनोविकलांगाला लाथांचा प्रसाद सुप्याचा वाहतूक पोलीसाचा प्रताप!

## घटनेचा व्हिडीओ व्हायरल

सुपा : प्रतिनिधी

नगर-पुणे महामार्गावरील एका दुकानासमोर बसलेल्या मनोविकलांग व्यक्तीला सुपे पोलीस ठाण्याच्या वाहतूक पोलीसाकडून लाथांचा प्रसाद देण्याचा संतापजनक प्रकार पुढे आला असून या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

या संतापजनक घटनेची चौकशी करून दोषी पोलीस कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी पोलीस अधीक्षकांकडे करण्यात येत आहे. सुप्यातील रहिवासी असलेला हा मनोविकलांग व्यक्ती सुप्यामध्ये फिरत असतो. त्याचा कोणास त्रासही नसतो. रविवारी दुपारी ही विकलांग व्यक्ती जुन्या पोलीस ठाण्याशेजारील एका दुकानासमोर बसलेली असताना वाहतूक पोलीस तिथे पोहचले. आणि त्यांनी या व्यक्तीस लाथांनी मारण्यास सुरूवात केली. एका मनोविकलांगास पोलीसाकडून मारहाण होत असल्याचे पाहून रस्त्यावरून जाणारे येणारे प्रवासी संताप व्यक्त करत होते. काही प्रवाशांनी या घटनेचा व्हिडीओ चित्रीत करून तो सोशल मीडियावर व्हायरल केल्यानंतर अनेक नागरिकांनी पोलीसाच्या वर्तनुकीविषयी नाराजी व्यक्त करत कारवाईची मागणी केली.




■ सुप्यातील वाहतूक पोलीसाने मनोविकलांग व्यक्तीस लाथांचा प्रसाद देत असंवेदनशिलतेचे दर्शन घडविले.

मनोविकलांग व्यक्तीस कशाच्या कारणावरून वाहतूक पोलीसाने मारहाण केली याची माहीती पुढे आली नसली तरी अशा पध्दतीने लाथांनी मारहाण करण्याचा अधिकार या पोलीसास कोणी दिला असा सवाल करण्यात येत आहे. गोरगरीब, वंचितांना अधार देणे हे पोलीस प्रशासनाचे कर्तव्य आहे. वाहतूकीचे नियम मोडणारांवर दंडात्मक कारवाई करणे, वाहतूकीचे नियमन करणे, बेशिस्त वाहन चालकांवर कारवाई करणे हे वाहतूक पोलीसाचे काम असताना मनोविकलांग व्यक्तीस लाथांचा प्रसाद देणे हे कितपत संयुक्तीक आहे असा सवाल करण्यात येत आहे.








# युवा

## हनिमूनला झालेल्या या ५ चुका वैवाहिक जीवन करतात उद्ध्वस्त

**हनीमून हा जोडप्यांसाठी सर्वात सुंदर क्षण आहे. यादरम्यान ते एकमेकांना समजून घेतात आणि भावनिकरित्या कनेक्ट होऊ शकतात. पण हनिमूनला झालेल्या त्यांच्या काही चुकांमुळे त्यांचे वैवाहिक जीवन गोड सुरुवात करण्याऐवजी उद्ध्वस्त होऊ शकते. अशा परिस्थितीत, हे करणे पूर्णपणे टाळणे चांगले.**



लग्नानंतरचा हनिमून हा जोडप्यांसाठी सर्वात खास क्षण असतो. या काळात, कुटुंब आणि नातेवाईकांपासून दूर, जोडप्यांना एकमेकांना जाणून घेण्यासाठी आणि समजून घेण्यासाठी वेळ मिळतो. प्रेमविवाह असेल तर गोष्ट वेगळी, पण लग्न जर अरेंज्ड मॅरेज असेल तर पती-पत्नीला एकत्र वेळ घालवण्याची ही पहिलीच संधी असते. अशा परिस्थितीत या वेळेचा खर्च आणखी वाढतो. हनिमूनचा संबंध सहसा फक्त शारीरिक संबंधांशी असतो, पण सत्य हे आहे की विवाहित जीवनात प्रथमच प्रवेश करणारी जोडी पती-पत्नी म्हणून एकमेकांसोबत वेळ घालवत असते. या क्षणांशी खूप खोल भावना निगडीत आहेत. यामुळेच या काळात काही चुका झाल्या तर आपल्या वैवाहिक जीवनाची चांगली सुरुवात करण्याचा विचार करणाऱ्या जोडप्याचे वैवाहिक जीवन आपोआपच विनाशाकडे घेऊन जाते. अशाच काही चुका येथे सांगितल्या जात आहेत, ज्या हनीमूनला जाणाऱ्या जोडप्यांनी टाळल्या पाहिजेत.

- लग्नादरम्यान जे काही घडले त्यावर चर्चा करणे टाळा : लग्न समारंभात काहीतरी चूक होते हे सर्वांनाच माहीत आहे आणि समजते. याबाबत दोन्ही पक्षांमध्ये वाद किंवा मतभेद असू शकतात, परंतु हनिमूनच्या वेळी या गोष्टींवर चर्चा करत राहणे ही सर्वात मोठी चूक आहे.
- खूप अपेक्षा : पूर्वनियोजित पुलाव शिजवू नका. हनिमूनचा प्रवास ही एकमेव गोष्ट आहे जी तुम्ही आगाऊ योजना करू शकता. पण यानंतर तुमचा वेळ किती आनंदात जाईल हे फक्त जोडप्याच्या दुतर्फा प्रयत्नांवर अवलंबून असेल. जबरदस्तीच्या अपेक्षा घेऊन जाऊ नका आणि त्या पूर्ण झाल्यावर गर्वाने बसू नका. त्यापेक्षा, हनिमूनमध्ये तुम्ही दोघे भावनिकदृष्ट्या कसे जवळ येऊ शकता आणि एकमेकांना पती-पत्नी म्हणून स्वीकारून वैवाहिक जीवनात पुढे कसे जाऊ शकता यावर लक्ष केंद्रित करा.
- भूतकाळाबद्दल बोलणे टाळा : समजा तुम्ही मनाने खूप प्रामाणिक आणि स्वच्छ व्यक्ती आहात आणि तुम्हाला तुमच्या जोडीदारापासून कोणतीही गोष्ट लपवून ठेवायची नाही, पण हनिमूनला भूतकाळाबद्दल अजिबात बोलू नका. तुमचा भूतकाळ तुमच्या मागे आहे आणि आता तुम्ही नवीन आयुष्य सुरू करत आहात. अशा स्थितीत मनातून काढून टाका की आधी काय होतं. तुमच्या नवीन जोडीदाराचे आणि आयुष्याचे कौतुक करून दर्जेदार वेळ घालवा. आनंदी क्षणांच्या जास्तीत जास्त आठवणी गोळा करा. जेणेकरून भविष्यात हे क्षण तुमच्यासाठी गोड आठवणी बनतील आणि तुमच्या चेहऱ्यावर हास्य आणू शकतील.
- वाद वाढवणे टाळा : कोणतीही दोन व्यक्ती सारखी नसतात यात शंका नाही. अशा परिस्थितीत, हनीमूनमध्ये असे अनेक क्षण येऊ शकतात, जेव्हा दोघांच्या वेगळ्या विचारसरणीत संघर्ष होऊ शकतो. पण त्यांना अजिबात वरचढ होऊ देऊ नका किंवा त्यांना मोठे होऊ देऊ नका. एखाद्या गोष्टीवरून वाद झाला तर दोन मिनिटे ब्रेक घ्या, एकमेकांना सॉरी म्हणा आणि मग पुन्हा आनंदी व्हा आणि एकत्र वेळ घालवा. छोट्या-छोट्या वादांवर रागवत बसलो तर संपूर्ण हनिमूनच नव्हे तर वैवाहिक जीवनाची संपूर्ण सुरुवातच व्यर्थ वाटू लागते.



### तुमचा संपूर्ण हनीमून हॉटेलच्या खोलीत घालवू नका...

लग्नाचे कार्यक्रम इतके थकवणारे असतात की एखाद्याला अनेक दिवस विश्रांतीची आवश्यकता असते. पण यासाठी हनिमून बनवला जात नाही. तुमच्या खोलीत वेळ घालवण्याऐवजी बाहेर जा आणि निसर्गरम्य ठिकाणे पहा.

## नाही म्हणायला शिका!

**अनेकांना कोणतेही काम नाकारण्यात अडचण येते. पण या समाजात नाही म्हणण्याचे कौशल्य तुमच्यात असले पाहिजे. नाहीतर तुमची फसवणूक होऊ शकते. खरं तर, आयुष्यात असे काही प्रसंग येतात जेव्हा तुम्ही नाही म्हणायला कचरत असाल तर ती तुमची सर्वात मोठी चूक ठरते. अशा प्रसंगी सावधपणे बोलायला शिकणे महत्त्वाचे आहे.**



मला नाही म्हणायला जमत नाही. मला कोणाला नाही म्हणायला त्रास होतो. ही परिस्थिती प्रत्येकासोबत असते. नाही म्हटल्याने आपण गुन्हा केला आहे, असे वाटते. असे बरेच लोक आहेत ज्यांना वैयक्तिक किंवा व्यावसायिक जीवनात कोणाला नाही म्हणण्याची हिंमत नसते. या सवयीमुळे माणसे कधी कधी स्वतःचेच नुकसान करतात. त्यांच्यात तणावही वाढतो. म्हणून, आपल्या आनंदासाठी आणि मजबूत नातेसंबंधासाठी, आपण काही प्रसंगी नकार दिला पाहिजे. असं म्हणतात की खूप चांगलं असणं हे स्वतःच्या नुकसानीचं कारण बनतं. नाही न बोलण्याची तुमची सवयही यापैकीच एक आहे. आयुष्यात यशस्वी होण्यासाठी नाही कधी म्हणायचे हे समजून घेतले पाहिजे. कारण काही प्रसंगी हो म्हणणे ही सर्वात मोठी चूक ठरते. अशा परिस्थितीत नाही म्हणायला शिका. चला तर मग आम्ही तुम्हाला कधी, कुठे आणि कसे नाही म्हणायचे ते सांगतो...

### नाही म्हणणे ही एक कला आहे...

वैयक्तिक-व्यावसायिक वाढीसाठी आणि निरोगी नातेसंबंधांसाठी नाही म्हणण्याची कला प्रत्येकाला अवगत असावी. ही कला विकसित झाली की माणसाला त्याच्या आयुष्यात सकारात्मक बदल जाणवतात. जगाला सुखावण्याचे दडपण त्याच्या मनातून दूर होते. मग तो त्याच्या इच्छेनुसार, स्वभावानुसार आणि गरजेनुसार निर्णय घेतो. नाही म्हणायला अजिबात अजिबात संकोच करू नका, जेव्हा संबंध येतो तेव्हा प्रेमाने नकार समजावून सांगा.

- **जेव्हा स्वाभिमानाशी तडजोड करावी लागेल** : कोणतेही काम करताना तुम्ही तुमच्या स्वाभिमानाशी तडजोड करत असाल तर तुम्ही हे काम पूर्णपणे नाकारले पाहिजे. कारण एखाद्या व्यक्तीचा स्वाभिमान त्याच्यासाठी सर्वकाही आहे. त्यामुळे स्वाभिमान लक्षात घेऊन बोलायचेच असेल तर न डगमगता बोलावे.
- **असे काम ज्यामुळे तुम्हाला ताण येतो** : लक्षात ठेवा की मानवाच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक क्षमता मर्यादित आहेत. सगळ्यांना खूश करण्याच्या प्रयत्नात तुम्ही या मर्यादा ओलांडल्यास आणि होय म्हणाल तर त्याचा परिणाम तणाव, जळजळ आणि आरोग्याच्या समस्या असतील. त्यामुळे, ज्या कामात तुम्हाला तणाव वाटत असेल ते काम नाकारणे शहाणपणाचे ठरेल.
- **भीती किंवा धमकी** : आपल्या आजूबाजूला अशी अनेक माणसे सापडतील की, जे आपला अधिकार व्यक्त करताना म्हणतात, मला नाही ऐकायची सवय नाही. अशा लोकांच्या इच्छा पूर्ण करताना काही लोक नाही म्हणण्याची कलाही विसरतात. त्यांनाही नाही म्हणायलाही शिका. तुमच्या होकाराच्या नादात अशी लोक तुमच्यावर हुकूमत गाजवण्यासही कमी करत नाही.
- **जेव्हा विश्वास डगमगतो** : अनेक वेळा असे घडते की आपल्या प्रियजनांच्या बोलण्याने आपल्यावर प्रभाव पडतो आणि आपण त्या कामांना हो म्हणतो ज्यावर आपला स्वतःचा विश्वास नाही. परंतु यामुळे, ते सुख आणि नातेसंबंध आपण वाचवू शकत नाहीत, उलट विनाशाकडे आपल्याला घेऊन जात असते. त्यामुळे जोपर्यंत तुमचा स्वतःवर विश्वास नाही तोपर्यंत हो म्हणण्याची चूक करू नका.



- **जेव्हा नाते विषारी बनते** : वैयक्तिक जीवन असो किंवा व्यावसायिक, जेव्हा नातेसंबंध विषारी होऊ लागतात तेव्हा नाही म्हणणे महत्त्वाचे असते. नात्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी त्यांच्यापासून अंतर राखणे केव्हाही चांगले. समोरच्याने सांगितलेली प्रत्येक गोष्ट मनापासून पाळायची असेल तर नाही म्हणायला हवे. यामुळे तुम्ही काही काळ दुःखी व्हाल, पण रोजच्या तणावातून तुमची सुटका होईल.
- **जर तुमच्याकडे वेळ नसेल तर तुमचे नुकसान होईल** : मागची वेळ कधीच परत येत नाही, म्हणून वेळेचा आदर केला पाहिजे. तुमच्याकडे वेळ नसेल तर दुसऱ्याच्या कामाला नाही म्हणण्यात काही गैर नाही. अशा परिस्थितीत तुम्ही नाही म्हटले नाही तर तुमचे काम वेळेवर पूर्ण करता येत नाही. मग तुमचे थेट नुकसान होते आणि आयुष्यात इतरांपेक्षा मागे राहण्याची शक्यता वाढते. म्हणून, यशस्वी होण्यासाठी नाही म्हणा.

## वयापेक्षा मोठ्या मुलींच्या प्रेमात का पडताहेत मुले?



**बदलत्या काळानुसार डेटिंगच्या जगात अनेक बदल झाले आहेत. मुले आता त्यांच्या वयाच्या मुलींऐवजी त्यांच्यापेक्षा मोठ्या मुलींना प्राधान्य देत आहेत. अशा वेळी विचार नक्कीच येतो की यामागे काय कारण आहे, तर रिलेशनशिप कोचने मुलांच्या आकर्षणाचे कारण सांगितले आहे. प्रेमाचे कोणतेही निश्चित निकष नसतात, म्हणजे कोणाच्याही प्रेमात पडू शकते. जात, रूप आणि वय हे प्रेमाच्या आड येत नाही. तथापि, हे देखील खरे आहे की आजपर्यंत लग्नासाठी मुलीचे वय मुलापेक्षा नेहमीच कमी असणे आवश्यक आहे. समाजानुसार नात्यातील मुलगा मुलीपेक्षा मोठा असावा. पण काळानुसार मुलांच्या आवडीनिवडी बदलत आहेत. आता मुलांची आवड तरुणांमध्ये नाही तर मोठ्या मुलींमध्ये वाढत आहे. ज्याची उदाहरणे चित्रपट आणि टीव्ही इंडस्ट्रीतही पाहायला मिळतात. अशा परिस्थितीत, अशी कोणती कारणे आहेत जी मुले मोठ्या मुलींकडे आकर्षित होतात याचा विचार करणे योग्य आहे. या आकर्षणामागील कारण समजून घेण्यासाठी, आम्ही रिलेशनशिप कोच आणि Predictions for Success चे संस्थापक विशाल भारद्वाज यांच्याशी बोललो. ही कारणे जाणून घेऊया...**

- परिपक्वता आणि आत्मविश्वास : मुले आता त्यांच्या जोडीदारांमध्ये परिपक्वता आणि आत्मविश्वास यासारखे गुण शोधू लागली आहेत. या गोष्टी त्यांच्यापेक्षा मोठ्या मुलींमध्ये जास्त दिसतात. त्या नोकरी किंवा व्यवसाय करत असल्यामुळे त्यांची विचार करण्याची पद्धतही वेगळी असते. जोडीदाराला पर्सनल स्पेस देण्याबरोबरच त्या सपोर्टही करते. ज्यामुळे तरुण मुलांचे आकर्षण निर्माण होते.
- असुरक्षित नाही : जेव्हा जेव्हा लहान मुलाला मोठी मुलगी आवडते तेव्हा त्याला नात्यात असुरक्षितता नसते. कारण वृद्ध महिलांना प्रेम आणि रोमान्सचा अधिक अनुभव असतो. एकटे राहण्याची भीती त्यांच्या मनातून निघालेली असते. नात्यातील स्वाभिमान न गमावता आपल्या जोडीदाराला कसे आनंदी ठेवायचे हे त्यांना माहीत असते.
- संबंध कसे हाताळायचे हे माहित आहे : मोठ्या मुलींचे नातेसंबंधांबाबत स्पष्ट मत असते. तिच्या मनाचा आणि मनाचा योग्य वापर करून नातेसंबंध कसे हाताळायचे हे तिला चांगलेच ठाऊक असते. स्वतःचा आनंद बाजूला ठेवून ती जोडीदाराच्या आनंदाला महत्त्व देते. कारण ती छोट्या छोट्या गोष्टींकडे दुर्लक्ष करायला शिकलेली असते. तिची ही शैली मुलांना आवडते.
- एक चांगला अनुभव घ्या : तरुण मुलींना सांसारिक बाबींची फारशी माहिती नसते. त्यांच्यासाठी छोट्या गोष्टीही मोठ्या होतात. मोठ्या मुलींची समज चांगली विकसित झालेली असते. अशा परिस्थितीत त्यांना कोणत्याही समस्येवर उपाय शोधणे सोपे जाते. त्यामुळे मुलांना तिला आपला जीवनसाथी बनवायचा असते. त्यांना तिच्यासोबत अधिक सुरक्षित वाटते.
- ब्रॉड माइंडेड असणं हेही एक कारण आहे : विवाह किंवा नातेसंबंधातील वयाच्या घटकाबाबत बदलत जाणारे विचार हे देखील याचे प्रमुख कारण आहे. प्रियांका-निक जोनास, ऐश्वर्या-अभिषेक बच्चन आणि बिपाशा-करण सिंग यांसारख्या अनेक सेलिब्रिटींच्या आयुष्याचा परिणाम सामान्य जनजीवनावर झाला आहे. नातेसंबंधात प्रेम आणि आदर महत्त्वाचा असतो आणि त्याचा वयाशी काहीही संबंध नसतो हे आता लोकांना समजू लागले आहे.

## तोच खरा पुरुष!

**जर तो खरा माणूस असेल तर... हे वाक्य चित्रपटातच नाही तर सर्वसामान्यांच्या जीवनातही अनेकांच्या तोंडून बाहेर पडलं असेल. हे शब्द माणसाला सर्वात जास्त चालना देतात. कारण लहानपणापासूनच प्रत्येकाच्या मनात एक चांगुलपणाची भावना तयार केलेली असते. यामुळे व्यक्तीमत्त्व ठरत असते. संस्कार याला कारणीभूत ठरत असतात. प्रामाणिकपणा, माणुसकी जपणाऱ्यांच्या बाजूने चांगली परिस्थिती कायम असते, तर स्वार्थी, कपटी लोकांच्या बाजूने तात्कालिक परिस्थिती जाणवत असली तरी दीर्घकाळ ती टिकत नाही. एक ना एक दिवस त्यांच्या पापाचा घडा भरतोच...**




- दुर्बलांना दाबण्याचा प्रयत्न : खरा माणूस आपली ताकद सिद्ध करण्यासाठी त्याच्यापेक्षा दुर्बलांना दडपण्याचा किंवा शोषण करण्याचा कधीही प्रयत्न करत नाही. उलट तो त्यांना मदत करतो. तो त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध बोलतो आणि त्यांचे जीवन सुधारण्याचा प्रयत्न करतो. त्याला भीती वाटत नाही की एक कमकुवत व्यक्ती त्याच्या स्तरावर पोहोचेल. त्याच्यासाठी महत्त्वाची गोष्ट म्हणजे जर त्याने दुर्बलांना मदत केली नाही तर तो स्वतःला काय उत्तर देईल?
- मुले, महिला आणि दुर्बलांवर हात उचलणे : वैवाहिक जीवनात, नातेसंबंधात किंवा सामान्य सामाजिक जीवनात काही पुरुष आपल्या शारीरिक शक्तीचा गैरवापर करतात असे अनेकदा दिसून येते. ते लहान मुले, स्त्रिया, वृद्ध आणि कोणत्याही शारीरिक दुर्बल व्यक्तीवर हात उचलतात. यातून त्यांच्या मनात भीती निर्माण होते. त्यांना इतरांना घाबरवायला आवडते. कारण यामुळे त्यांचा अहंकार वाढण्यास मदत होते. सत्य हे आहे की खऱ्या पुरुषाला त्याचे पुरुषत्व सिद्ध करण्यासाठी कोणालाही घाबरवण्याची गरज नाही. त्यापेक्षा इतरांच्या मनात स्वतःबद्दल आदर असणे त्यांच्यासाठी अधिक महत्त्वाचे आहे.
- भावना व्यक्त करत नाही : मुले रडत नाहीत, हे लहानपणापासूनच मुलांच्या मनात इतकं रुजलं आहे की ते मोठे झाल्यावरही कधीच त्यांच्या भावना व्यक्त करत नाहीत. पण खरा पुरुष भावनांपासून दूर पळत नाही. याला तो कमकुवतपणा मानत नाही. उलट ते अभिमानाने आपल्या भावना व्यक्त करतात.
- इतर काय विचार करतील : खरे पुरुष योग्य गोष्ट करण्याआधी लोक काय म्हणतील याचा विचार करत नाहीत! त्यांच्यासाठी, सर्व बाबी म्हणजे जे योग्य आहे त्याचे समर्थन करणे आणि जे चुकीचे आहे ते सहन न करणे. ते त्यांचे काम इतरांकडून प्रमाणित होण्याची वाट पाहत नाहीत.

## रडण्यावर ठेवा नियंत्रण, कुणी म्हणणार नाहीत कमकुवत!

**काहींना राग आला की वाद घालताना अश्रू ढाळतात. आता ज्याच्यावर राग येतो त्याच्यासमोर रडायला लागलं तर तो कमकुवत समजायला लागतो. अशा परिस्थितीत भावनांवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. स्वतःला सर्वांसमोर रडण्यापासून रोखण्यासाठी तुम्ही काही टिप्स वापरून पाहू शकता...**

कोणत्याही व्यक्तीचे रडणे ही त्याची कमजोरी समजली जाते पण जर कोणी रडत असेल तर तो अशक्त आहे असे अजिबात समजायचे कारण नाही. अनेकदा तुम्ही पाहिलं असेल की काही लोक रागावतात तेव्हा त्यांना रडावंसं वाटतं. त्यांचा राग तीव्र शब्दांत व्यक्त करायचा असतो, पण राग येण्यापूर्वी अश्रू येतात. वैयक्तिक किंवा व्यावसायिक जीवनात असे प्रसंग अनेकदा येतात. ज्याच्यावर तुमचा राग आहे त्या व्यक्तीसमोर तुम्ही जर रडलात तर अनेकदा तुम्हाला अस्वस्थ वाटते. आपण स्वतःलाच शिव्या देतो आणि त्या वेळी आपण स्वतःला रडण्यापासून का थांबवू शकलो नाही याचे आश्चर्य वाटते. तथापि, काही सोप्या टिप्सचा अवलंब करून, आपण वादाच्या वेळी आपले अश्रू नियंत्रित करू शकता...



- कारण समजून घ्या : तुमच्या वैयक्तिक आयुष्यात व्यावसायिक मीटिंगमध्ये किंवा वादाच्या वेळी तुम्ही कधी रडत असाल, तर प्रथम कारण समजून घेण्यावर लक्ष केंद्रित करा. हे काय आणि का होत आहे याचा विचार करा. जेव्हा तुम्हाला कारण नीट समजले, तेव्हा तुम्ही रडण्याऐवजी प्रतिसाद देऊ शकाल. तर्काने बोलाल तर रडावेसे वाटणार नाही.
- लक्ष विचलित करा : जर तुम्हाला वादाच्या वेळी रडल्यासारखे वाटत असेल तर तुमचे लक्ष दुसरीकडे केंद्रित करण्याचा प्रयत्न करा. चेहऱ्याचे स्नायू घट्ट ठेऊन, हनुवटी थोडी वर उचला. त्यानंतर दीर्घ आणि दीर्घ श्वास घेत राहा. अशा परिस्थितीत इच्छा नसतानाही रडण्याची शक्यता कमी होते. या काळात तुम्ही क्लच, रिंग किंवा शर्टची बटणे इत्यादींसह खेळू शकता.
- थोडा वेळ शांत व्हा : जेव्हा जेव्हा वाद होतो तेव्हा बोलण्यापेक्षा ऐकण्यावर जास्त भर द्या. जेव्हा वाद वाढतो तेव्हा मोठ्याने बोलण्याचा किंवा ओरडण्याचा प्रयत्न करू नका. जर तुम्ही शांतपणे उत्तर दिले आणि परिस्थिती समजून घेतली तर तुम्हाला रडावेसे वाटणार नाही. त्यापेक्षा तुमचा मुद्दा मांडून तुम्ही स्वतःला बरोबर सिद्ध करू शकाल.
- शक्य असल्यास पाणी प्या : वादाच्या वेळी शांत राहण्यासाठी, शक्य असल्यास पाणी प्या, यामुळे तुम्हाला वाद समजण्यास वेळ मिळेल. तसेच पाणी प्यायल्याने तुमचे मन थोडे शांत होईल. यामुळे तुमची भावना थोडी बदलेल, मग तुम्हाला रडावेसे वाटणार नाही. आणि तुम्हाला तुमचे मत मांडण्याची संधी मिळेल.

## शॉर्ट न्यूज

### धान्यदुकानदार संघटनेच्या अध्यक्षपदी खंडू भुकन

**पारनेर :** तालुका धान्य दुकानदार संघटनेची नुकतीच बैठक झाली या बैठकीत नवीन पदाधिकारी कार्यकारणीची बिनविरोध निवड करण्यात आली यात अध्यक्षपदी खंडू विठ्ठल भुकन तर सचिवपदी रमेश गवळी यांची निवड करण्यात आली. पारनेर तालुका धान्य दुकानदार संघटनेची पारनेर येथे बैठक झाली धान्य दुकानदारांना येणाऱ्या अडचणी व त्याची सोडवणूक संघटनेच्या माध्यमातून केली जात असते. पारनेर तालुक्यात १४९ धान्य दुकाने आहेत त्या दुकानदारांपैकी १२ पदाधिकारी सदस्यांची कार्यकारिणी सर्वानुमते निवड करण्यात आली.

### श्रीगोंद्याच्या बाजारतळामध्ये चिखलाचे साम्राज्य

**श्रीगोंदा :** शहरातील बाजार तळामध्ये नगरपालिकेने विक्रेत्यांना बसण्यासाठी ओटे आणि छत केलेले आहेत परंतु तालुक्याच्या ठिकाणचा बाजार असल्यामुळे ही जागा अपुरी पडत असून उर्वरित जागेमध्ये पावसाच्या चिखलाचे साम्राज्य तयार झाले आहे याकडे मात्र प्रशासनाचे दुर्लक्ष होताना दिसत आहे.

### खो-खो व हॉलीबॉल स्पर्धा उत्साहात

**नगर :** निमगाव वाघा (ता. नगर) येथील नवनाथ विद्यालयात शालेय कबड्डी, खो-खो व हॉलीबॉल स्पर्धा पार पडल्या. यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. जिल्ह्यात शिक्षण सप्ताह साजरा होत असताना क्रीडा दिनानिमित्त या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनाप्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रम देखील पार पडला. मुला-मुलींनी सांस्कृतिक कार्यक्रमातून कलागुणांचे सादरीकरण केले. स्पर्धेचे उद्घाटन मुख्याध्यापक उत्तम कांडेकर यांच्या हस्ते झाले.

### धूमस्टाईलने महिलेच्या गळ्यातील गंठण चोरी

**संगमनेर :** शहरात शनिवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास अकोले बाह्यवळण मार्गाने पायी जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील गंठण दुचाकीवर आलेल्या चोरट्यांनी धूमस्टाईलने ओरबाडून पोबारा केल्याची घटना घडली. कमल राधाकिसन दिये (रा. जनतानगर, संगमनेर) या अकोले बाह्यवळण रस्त्यावरून पायी जात होत्या. दरम्यान, गांधी मोटर्सजवळ आल्या असता दुचाकीवरून आलेल्या अज्ञात दोन चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील साठ हजार रुपये किमतीचे गंठण ओरबाडून पोबारा केला. कमल दिये यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शहर पोलिसांनी अज्ञात दीन चोरट्यांवर गुन्हा दाखल केला.

### नेवाशाची जागा शिवसेनेसाठी सोडण्याची मागणी

**नेवासा :** विधानसभेची निवडणूक जवळ येऊन ठेपलेली असताना निवडणुकीच्या रणधुमाळीत महायुतीच्या मित्र पक्ष असलेल्या भारतीय जनता पार्टीमध्ये पक्षांतर्गत प्रचंड गटतट निर्माण झालेले आहेत. त्यामुळे स्वतंत्र नेवासा विधानसभा मतदारसंघाची जागा महायुतीकडून मुख्यमंत्री शिंदे यांच्या शिवसेनेला घेण्याची मागणी नेवासा शिवसेना तालुकाप्रमुख सुरेश डिके यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे. तालुकाप्रमुख डिके म्हणाले की, नेवासा विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी सध्या भाजपमध्ये प्रचंड गटतट निर्माण झालेले असून पक्षांतर्गत कुरघोड्या सुरु आहेत.

# उच्च व दर्जेदार शिक्षण ही काळाची गरज

## ■ राष्ट्रवादीचे नेते देवदत्त निकम यांचे प्रतिपादन
## ■ शिक्षण संवाद यात्रेचा पहिल्या टप्प्याचा समारोप



**शिरुर : प्रतिनिधी**

**सर्वसामान्य विद्यार्थ्यांना उच्च व चांगल्या दर्जाचे शिक्षण उपलब्ध होण्यासाठी ॲड. संग्राम शेवाळे हे धडपड करीत आहेत. हे काम नवी तरुण पिढी समोर एक आदर्श उभा करणारे असल्याचे प्रतिपादन शिरूर आंबेगाव राष्ट्रवादीचे नेते देवदत्त निकम यांनी केले.**

ॲड. संग्राम नाथाभाऊ शेवाळे यांनी शिरूर तालुक्यामध्ये गेली आठ दिवसापासून चालू केलेल्या शिक्षण संवाद यात्रेचा पहिल्या टप्प्याचा समारोप कारेगाव येथील अक्षरनंदन ज्युनिअर कॉलेजमध्ये पार पडला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. निकम बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनता दलाचे प्रदेशाध्यक्ष नाथाभाऊ शेवाळे होते.

भारतात व परदेशात नामांकित संस्थामध्ये जाऊन उच्च शिक्षण घेण्याची अनेकांची इच्छा असते परंतू मार्गदर्शनाअभावी विद्यार्थी तिथपर्यंत पोहचत नाहीत. तसेच परदेशात सामान्य घरातील भारतीय विद्यार्थी खूपच कमी दिसून येतात. ग्रामीण भागात माहितीचा अभाव, पुरेसे मार्गदर्शन न मिळणे, आर्थिक अडचणी, आदींमुळे विद्यार्थ्यांत उच्च शिक्षणाबाबतचा निरुत्साह वाढत असल्याचे दिसून येते. सामान्य कुटुंबातील होतकरू विद्यार्थ्यांना देशातील व परदेशातील उच्च शिक्षणाची दारे खुली करण्याच्या मुख्य उद्देशाने आम्ही शिक्षण यात्रेचे आयोजन करत असल्याचे ॲड. शेवाळे यांनी अक्षरनंदन ज्युनिअर कॉलेज येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले.

ही शिक्षण यात्रा शिरूर तालुक्यात टाकळी हाजी, वडनेर खु, मलठण, कान्हूर मेसाई, कवठे येमाई, पाबळ, रांजणगाव, करडे, सरदवाडी, शिरूर, करंदी वाघाळे, जातेगाव, निमगाव भोगी, न्हावरे, या महाविद्यालयात आठ दिवसात पोहोचली.

या शिक्षण यात्रेत विद्यार्थांना मार्गदर्शन करताना चेवेनिंग शिष्यवृत्ती प्राप्त ॲड. दीपक चटप हे म्हणाले कि, शिक्षण संधीचे विकेंद्रीकरण करण्यासाठी व देश-विदेशातील नामांकित विद्यापीठे, उच्च शिक्षणासाठी या परदेशी संस्था चेवेनिंग स्कॉलरशिप, कॉमनवेल्थ स्कॉलरशिप, इरॉसम मुंडूस स्कॉलरशिप या शिष्यवृत्ती बरोबरच राज्य व केंद्र सरकारच्या वतीनेही अनेक शिष्यवृत्ती योजना असुन यामधुन परदेशी शिक्षणासाठी संपूर्ण खर्चाची मदत होत असल्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणात जाण्यासाठी मोठी संधी असल्याचे ॲड. दीपक चटप यांनी सांगितले.

जागतिक पातळीवर वाढलेल्या स्पर्धात्मक युगात सामर्थ्यवान राष्ट्र निर्माण करण्यासाठी तितकीच सक्षम आणि बुद्धिमान भारतीय तरुणांची फळी निर्माण होणार असल्याचा आत्मविश्वास ॲड. बोधी रामटेक यांनी दिला.

यावेळी जनता दलाचे प्रदेशाध्यक्ष नाथाभाऊ शेवाळे, कारेगावचे माजी उपसरपंच सयाजी नवले, हनुमान सेवा सोसायटीचे माजी चेअरमन हरिभाऊ शेवाळे, राहुल गवारे, प्रहार संघटनेचे अध्यक्ष बापूसाहेब नवले, माजी नगरसेवक रवींद्र धनक, स्वप्नील शेवाळे, कुमार नाणेकर, प्राचार्य स्नेहलता यादव, शुभम यादव,उपसरपंच राजेंद्र नवले,उद्योजक भारत नवले, उद्योजक शुभम शेवाळे, पालक, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोठेपणात लहानपण आठवते!

## पद्मश्री पोपटराव पवार यांचे प्रतिपादन । आदर्श गावात माजी विद्यार्थी मेळावा



**हिवरेबाजार : प्रतिनिधी**

**तब्बल २२ वर्षानंतर आदर्शगाव हिवरेबाजार मध्ये यशवंत माध्यमिक विद्यालयात शैक्षणिक वर्ष २००४ ते २००७ मधील माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा मोठ्या आनंदात व उत्साहात संपन्न झाला. यावेळी मोठेपणातच लहानपण आठवते असे प्रतिपादन पद्मश्री पोपटराव पवार यांनी व्यक्त केले.**

यशवंत सांस्कृतिक हॉल येथे आयोजित केलेल्या स्नेहमेळाव्यास पदमश्री डॉ. पोपटराव पवार, सरपंच सौ. विमलताई ठाणगे, सहदेव पवार, चिमाजी गोहड, एस.टी. पादीर, रो. ना. पादीर, वसंतराव कर्डीले, छबुराव ठाणगे विद्यालयाचे मुख्याध्यापक अमृते सर्व शिक्षक स्टाफ, शालेय विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

उपस्थित गुरुजनांच्या हस्ते सरस्वतीपूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. तद्नंतर माजी विद्यार्थ्यांकडून उपस्थित गुरुजनांचा यथोचित सन्मान करण्यात आला व भेटवस्तू देण्यात आली. तर २००६ बॅचमधील डॉ. सुशिल पादीर, पंकज ठाणगे, पवन ठाणगे, नंदलाल ठाणगे तसेच सर्व माजी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. स्वागत सोहळ्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याने आपापली ओळख करून दिली व मनोगत व्यक्त केले. मनोगतात प्रत्येकाने माध्यमिक शाळेतील आपापले अनुभव कथन केले. तसेच शिक्षकांविषयीच्याही आठवणी सांगितल्या. शाळेतील मस्ती, एकत्रितपणे केलेला अभ्यास, शिक्षकांचा विद्यार्थ्यांवरील वचक, शाळेतील क्रीडा स्पर्धा, शिक्षकांनी दिलेली शिक्षा, सांस्कृतिक कार्यक्रमाची धूम अशा विविध विषयांवर माजी विद्यार्थ्यांनी गप्पा करून जुन्या आठवणींना उजाळा दिला. या गप्पांच्या ओघात सर्वजण आपण इतके मोठे झालो हे विसरून गेले होते. निमित्त होते यशवंत माध्यमिक विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याचे.या शाळेत शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज राजकारण, उद्योग, शिक्षण, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात काम करीत असून त्यांनी आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटविला आहे.

कार्यक्रमाच्या सुंदर नियोजनाबाबत सर्वांना शुभेच्छा दिल्या व विद्यार्थ्यांच्या जीवनातील प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले. अशाप्रकारे अत्यंत खेळीमेळीच्या ,आनंदमय व उत्साहवर्धक वातावरणात स्नेहभोजनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## वाचकांच्या लेखणीतून

### भंजाळणे

मुंबईच्या महाराष्ट्र टाइम्स दैनिकात शब्दकळा नावाचे सदर चालू आहे. झिम्माड, जांगळबुत्ता (किंवा झांगडगुत्ता) या नावीन्यपूर्ण आणि अपरिचित शब्दांचा अर्थ आणि त्याच्या विविध अर्थच्छटा असा परिचय करून दिलेला असतो.

माझे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण निघोज (ता. पारनेर, जि. अहमदनगर) या माझ्या जन्मगावीच झाले. त्या काळात मनोरंजनाची आणि प्रबोधनाची साधने तुलनेने कमी असत. आकाशवाणी, भेदिक लावण्या, क्वचित पडद्यावरचे मराठी चित्रपट, यात्राखेत्रांमधले तमाशे हीच काय ती मनोरंजन आणि प्रबोधनाची साधने होती.



त्या काळात तमाशे पाहण्याची आम्हा मित्रमंडळींना फार हौस असे. गण, गवळण, रंगबाजी आणि वग अशी तमाशाची मुख्य अंगे असत.

रंगबाजीमधल्या एका विनोदी कलाकाराच्या तोंडचा एक शब्द त्या काळी आमच्या पंचक्रोशीत फारच प्रसिद्ध झाला होता. भंजाळणे. तो शब्द नव्हे; क्रियापदच म्हणावे लागेल. महत्प्रयासाने जमवून आणलेले कार्य विफल होते, त्याचा पचका होतो. त्यावेळेस माझे काम भंजाळले, असे म्हणतात. हा शब्द किती जुना आहे, हे सांगणे मात्र कठीण आहे. या क्रियापदाचा आणखी एक कंगोरा आहे. फार भंजाळू नकोस. याचा अर्थ मूर्ख होऊ नकोस. गोंधळू नकोस. असा होतो. भंजनम् शब्दावरून भंजाळणे क्रियापद आले की भंजाळणे या बोली किंवा प्राकृत भाषेतील क्रियापदावरून संस्कृत भंजनम् शब्द आला, हे सांगणेही कठीण आहे. पण भंजाळणे (बोली किंवा प्राकृत) आणि संस्कृत भंजनम् यांचा अर्थ मात्र जुळतो, हे विशेष!

बोली भाषेतल्या अशा शब्दांची व्युत्पत्ती लागेलच आणि ती सर्वांना पटेलच याची शाश्वती देता येत नाही. आपल्या इकडील प्रादेशिक बोलीभाषेतील भंजाळणे या शब्दाची व्युत्पत्ती मी लावली आहे. ती प्रत्येकाला पटेलच असे नाही. तसा माझा दावाही नाही.

मूर्तिभंजन शब्द आपण ऐकलेला असतो. याचा अर्थ मूर्तीची तोडफोड करणे किंवा विनाश करणे असा होतो. सारांश, भंजाळणे याचा अर्थ भंजन करणे असाच असावा, असे वाटते.

■ **नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

(पान १ वरून)

### सपोनी दंडगव्हाण, मुजावर तसेच उपनिरीक्षक मारक पारनेरला

कॅम्प ते राहता, राजेंद्र चाटे बेलवंडी ते नगर तालुका, अनंत सालगुडे कर्जत ते स्थानिक गुन्हे शाखा, सिचन लिमकर पाथर्डी ते श्रीगोंदा, संजय निकम श्रीरामपुर तालुका ते भिंगार कॅम्प, शुभांगी मोरे तोफखाना ते भिंगार कॅम्प, समीर अभंग श्रीगोंदे ते संगमनेर, भूषण हांडोरे अकोले ते कोपरगांव शहर, रणजीत मारक नगर तालुका ते पारनेर.

जिल्हयाबाहेरून आलेल्या पोलीस अधिकाऱ्यांमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक अभय दंडगव्हाळ पारनेर, विकास काळे कोतवाली, भारत बलैया शिर्डी, कल्पना चव्हाण नेवासा, संदीप हजारे शिर्डी, उज्वलसिंह राजपूत तोफखाना, धरमसिंह सुंदरडे शेवगांव, किशोर पवार कोपरगांव, हरीश भोये पाथर्डी, गणेश अहिरे श्रीगोंदे, संदीप परदेशी राहुरी, अमोल पवार राहुरी, युवराज आठरे आर्थिक गुन्हे शाखा, सोमनाथ दिवटे आर्थिक गुन्हे शाखा, उपनिरीक्षक शैलेश शेजुळ जामखेड, विकास जाधव एमआयडीसी, विनोद खांडबहाले अकोले, संदीप मुरकुटे श्रीरामपुर तालुका, रोशन निकम ,श्रीरामपुर शहर, प्रवीण महाले शेवगांव, महादेव गुट्टे पाथर्डी.






# नगरमध्ये सरकारी मेडिकल कॉलेज सुरु करणार

## खा.नीलेश लंके यांची ग्वाही



नगर : प्रतिनिधी

**नगरला सरकारी मेडिकल व्हावे यासाठी लोकसभेच्या अधिवेशन काळात केंद्रीय आरोग्य मंत्र्यांशी संपर्क केला असून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याची ग्वाही खा.नीलेश लंके यांनी दिली.**

खा.लंके पुढे म्हणाले की आज लहान-थोरांसाठी आरोग्य सेवा ही महत्वाची झाली आहे. आरोग्य अबाधित असेल तर सर्वकाही अलबेल असते. परंतु सध्याच्या आरोग्यावरील खर्च सर्वसामान्यांच्या आवाक्या बाहेर जात आहे. अशा परिस्थितीत मोफत आरोग्य सेवा मिळाल्यास त्याचा मोठा आधार ठरतो. कोरोना काळात मी व सहकार्यांनी केलेले काम सर्वांना परिचित आहे. त्या माध्यमातून मला रुग्णांची मोठी दुवा मला मिळाली. हेच कार्य भगवान फुलसौंदर नगरमध्ये करत असून, आरोग्य शिबीरे, योग-प्राणायम या माध्यमातून नागरिकांचे आरोग्य अबाधित राखत आहेत.

आजच्या शिबीराच्या माध्यमातून सर्वसामान्यांवर उपचार होणार आहेत, ही मोठी गोष्टी आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात आलेले हा उपक्रम कौतुकास्पद असाच आहे. अशा उपक्रमांची समाजाला गरज आहे. नगर शहरातील प्रत्येक चांगल्या कार्यासाठी आपले कायम योगदान राहील, असेही खा. लंके म्हणाले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रथम महापौर भगवान फुलसौंदर मित्र मंडळ व सुरभी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सर्वरोग निदान शिबीराचे उद्घाटन खा. नीलेश लंके यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी भगवान फुलसौंदर, शहरप्रमुख संभाजी कदम, अभिषेक कळमकर, किरण काळे, हॉस्पिटलचे चेअरमन अनिरुद्ध देवचक्के, शौकत तांबोळी, मनोज गुंदेचा, अवधुत फुलसौंदर, संजय गारुडकर, बाळासाहेब बोराटे, योगिराज गाडे, दत्ता जाधव, गणेश कवडे, सचिन शिंदे, संतोष गेनप्पा, संजय शेंडगे, अनिल बोरुडे, अशोक दहिफळे, सुरेश तिवारी, दत्ता कावरे, परेश लोखंडे, संदिप दातरंगे, प्रतिक भंडारी, अरुण झेंडे, मृणाल भिंगारदिवे, श्रीकांत चेमटे, महेश शेळके, महेश शेळके, सुरेश क्षीरसागर, रामनाथ सांगळे, ऋषीकेश सामल, संतोष डमाळे, जालिंदर बोरुडे, गणेश फुलसौंदर, राजेंद्र फुलसौंदर आदी उपस्थित होते.

याप्रसंगी भगवान फुलसौंदर म्हणाले, आजच्या बदलत्या जीवनशैलीमुळे अनेकजण कोणत्याना कोणत्या व्याधीने ग्रस्त आहेत. त्यावर वेळेच उपचार होणे गरजेचे आहे, ही गरज ओळखून शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित मोफत आरोग्य शिबीराच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे दु:ख कमी करण्याचा प्रयत्न होत आहे. तसेच नगरमधील आज अनेक विद्यार्थी डॉक्टर होण्यासाठी मोठ-मोठया शहरात जात आहे. जर नगरमध्येच सरकारी मेडिकल कॉलेज झाले तर त्यांचा फायदा जिल्ह्याला होईल. या संदर्भात आपण वेळोवेळी प्रशासनाशी पत्र व्यवहारही केला आहे. आपण केलेल्या मागणी संदर्भात खा.नीलेश लंके यांनी पुढाकार घेत नवीदिल्लीत आरोग्य मंत्रालयात पाठपुरावा करत आहे, त्यामुळे भविष्यात नगरमध्ये मेडिकल कॉलेज नक्कीच उभे राहील, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी हॉस्पिटलचे चेअरमन अनिरुद्ध देवचक्के म्हणाले, सुरभी हॉस्पिटलमध्ये सर्व आधुनिक मशिनरीद्वारे रुग्णांवर उपचार केले जात आहेत. येथून रुग्ण पुर्णपणे बरा होऊनच बाहेर पडतो. शासनाच्या विविध योजना या ठिकाणी उपलब्ध आहेत. भगवान फुलसौंदर यांनी सर्वरोग निदान शिबीराच्या माध्यमातून मोफत तपासणी व अल्पदरात उपचार सर्वसामान्यांना या सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत, ही कौतुकास्पद बाब असल्याचे सांगितले.

याप्रसंगी संभाजी कदम, अभिषेक कळमकर, किरण काळे आदिंनी मनोगतातून आरोग्य शिबीराचे आयोजन करुन खर्या अर्थाने सर्वसामान्यांना आरोग्य सेवेचा लाभ मिळवून दिला असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.श्रीकांत चेमटे यांनी केले तर आभार अवधूत फुलसौंदर यांनी मानले.

या शिबीरातील रुग्णांची डॉ.वैभव अजमेरे, डॉ.अमित भराडिया, डॉ.भगवान आगे, डॉ.प्रियन जुनागडे, डॉ.विलास व्यवहारे, डॉ.सुलभा पवार, डॉ. श्रीतेज जेजुरकर यांनी तपासणी करुन उपचार केले. या शिबीरासाठी असंख्य रुग्ण सहभागी झाले होते.

# गाडीलगांव-घोडोबा फाटा रस्त्याची दाणादाण

## संततधार पावसामुळे रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य

गाडीलगांव : प्रतिनिधी

**गेल्या पाच-सहा दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे गाडीलगांव-घोडोबा फाटा या रस्त्याची दाणादाण उडली असून या रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य निर्माण झाल्याने या रस्त्यावरून प्रवास करणे नागरीकांसाठी मुश्किल झाले आहे.**

भारताच्या स्वातंत्र्यपूर्व काळापासून गाडीलगांव-घोडोबा फाटा या रस्त्याच्या कामाला कधी मुहूर्तच मिळाला नाही. देखभाल दुरूस्ती तर दुरच ! आहे त्या रस्त्यावरून नागरीक चारचाकी, दुचाकी वाहनांनी या रस्त्यावरून प्रवास करतात. रस्त्यावर अनेक खडडे पडल्याने या रस्त्यावरून प्रवास करणारांचे साहसच म्हणावे लागेल. या रस्त्याने दररोज दुध वाहतूक करणारी वाहने, जवळे येथे शाळेसाठी जाणारे विद्यार्थी तसेच शेतमालाची वाहतूक करणारी वाहने यांची नेहमीच वर्दळ असते.

अगोदरच दयनीय अवस्था असलेल्या या रस्त्याची गेल्या पाच ते सहा दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे दाणादाण उडाली आहे. रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य निर्माण झाल्याने या रस्त्यावरून प्रवास करावा तरी कसा असा प्रश्न प्रवाशांपुढे निर्माण झाला आहे.

या मार्गावर पद्मावती वस्ती, साठे वस्ती, गणेशवाडी वस्ती, बोदगेवाडी आदी लहान मोठया वस्त्या आहेत. पावसाने रस्त्याची वाट लागल्याने या वस्त्यांवरील नागरीकांचे अतोनात हाल होत आहेत. या रस्त्यासाठी निधी मंजुर करून त्याची निर्मिती झाल्यास स्वातंत्र्यानंतर प्रथमच या रस्त्याचे भाग्य उजाळणार असून नागरीकांचा प्रवासही सुसाह्य होणार आहे. ग्रुप ग्रामपंचायत गुणोरे-गाडीलगांवच्या वतीने या रस्त्यासाठी प्रस्ताव तयार करून तो मंजुर करून घेण्यासाठी पाठपुरावा करण्याची आवश्यकता असल्याचे सेवानिवृत्त शिक्षक यशवंत गेणू गाडीलकर यांनी केली आहे.



**गुणोरे-घोडोबाफाटा या रस्त्याची संततधार पावसामुळे दाणादाण उडाली आहे.**

### वाहन घसरले, दुधाचे नुकसान

**सकाळी दुध संकलनासाठीचे एक वाहन गाडीलगांकडे येत असताना निसरडया रस्त्यावरून ते वाहन घसरून चारीमध्ये कोसळले. या अपघातामुळे वाहनाच्या नुकसानीबरोबरच वाहनातील २०० ते ३०० लिटर दुध सांडून नुकसान झाले. या अपघातातून आपण स्वतः बचावलो.**

**जयदीप वेताळ**
**दुध संकलन केंद्र संचालक,गुणोरे**

# कुंड पर्यटनस्थळ मार्गावर बससेवा हवी रस्त्याच्या दुरूस्तीचीही मागणी

## युवा सेना, शिवबा संघटनेने वेधले लक्ष

निघोज : प्रतिनिधी

**जगप्रसिध्द रांजणखळगे तसेच मळगंगा देवस्थानामुळे प्रसिध्दीस पावलेल्या कुंड पर्यटनस्थळ मार्गे शिक्रापुर पुणे तसेच टाकळी हाजी, नारायणगांव, मंचर बससेवा सुरू करण्याच्या मागणीबरोबरच निघोज ते कुंड रस्त्याची दुरूस्ती करण्याची मागणी युवा सेना सेना तसेच शिवबा संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.**



निघोज ते कुंड रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली असून त्याचा मनस्ताप पर्यटक तसेच या परीसरातील नागरीकांना होत आहे. या रस्त्यावरून या निघोज परिसरातील अनेक व्यापारी, नागरीक विविध कांमांसाठी पुणे तसेच नाराणगांव या भागात प्रवास करतात. यासंदर्भात युवा सेना तसेच शिवबा संघटनेच्या वतीने पारनेर बस स्थानकाचे आगार प्रमुख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता यांना निवेदन देण्यात आले आहे. खासदार नीलेश लंके यांनाही या मागणीसंदर्भात अवगत करण्यात आले असून त्यांनी या कामात लक्ष घालण्याचे आश्वासन दिले आहे. दरम्यान या रस्त्याचे काम होऊन बससेवा सुरू झाल्यास त्याचा लाभ पर्यटकांबरोबरच निघोज परिसरातील व्यापारी, नागरीक यांना होणार आहे.

युवा सेना तालुका प्रमुख तथा शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे, शेतकरी संघटनेचे उपतालुकाप्रुख किसन चौधरी, शैलेश ढवळे, उपतालुकाप्रमुख दत्ता टोणगे, उपतालुकाप्रमुख नागेश नरसाळे, उपतालुकाप्रमुख मोहन पवा, उपतालुकाप्रमुख सुयोग टेकुडे, शिवबा संघटना युवक अध्यख यश रहाणे, नवनाथ वरखडे, शांताराम पाडळे यांनी या मागणीसंदर्भात विविध मान्यवरांच्या भेटी घेऊन निवेदन सादर केले. या मागणीची तातडीने तड लावण्याचा आग्रह धरण्यात आला.

# जिल्हा परिषद शाळेचे शैक्षणिक उपक्रम विद्यार्थ्यांना उपयोगी

## सरपंच चित्राताई वराळ पाटील यांचे प्रतिपादन

निघोज : प्रतिनिधी

**जिल्हा परिषद शाळेचे शैक्षणिक उपक्रम विद्यार्थ्यांना उपयोगी पडणारे असून मराठी शाळेच्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थी तयार होतात ही अभिमानास्पद व कौतुकास्पद बाब असल्याचे प्रतिपादन सरपंच चित्राताई वराळ पाटील यांनी व्यक्त केले आहे.**

निघोज येथील जिल्हा परिषद मराठी शाळा माध्यमातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व शासनाच्या परिपत्रकानुसार दिनांक २२ ते २८ जुलै या कालावधीमध्ये शैक्षणिक सप्ताहाचे आयोजन जि.प.प्राथमिक शाळा निघोज येथे करण्यात आले. परिपत्रकाप्रमाणे अध्ययन साहित्य दिवस,मूलभूत संख्याज्ञान व साक्षरता दिवस,क्रीडा दिवस,इको क्लब उपक्रम वृक्षारोपण परसबाग निर्मिती,आणि शेवटी समुदाय सहभाग दिवस अंतर्गत सर्व पालकांच्या माध्यमातून सर्व मुलांना गोड जेवण दिले.

यावेळी सरपंच चित्राताई वराळ पाटील, ग्रामपंचायत सदस्य भावना साळवे, स्वरांजली केक्स गृहउद्योगच्या अध्यक्षा सरला रोहन उनवणे, रूपाली लंके, योगिता बोटकर, वंदना ससाणे,



रुपाली ससाणे, सायली ससाणे, अनेक माता,पालक, सर्व विद्यार्थी व केंद्रप्रमुख बाचकर साहेब उपस्थित होते. या सप्ताह मध्ये मुख्याध्यापक कैलास शिंदे शिंदे , शिक्षक श्री सुभाष मगर सर श्री काळे सर, श्री . काळोखे सर , शिक्षीका खोडदे मॅडम, दिघे मॅडम या शिक्षकांनी अतिशय उत्तम प्रकारे कामकाज करून हा शैक्षणिक सप्ताह यशस्वी केला त्याबद्दल केंद्रप्रमुख बाचकर यांनी कौतुक केले.

**गेली दहा ते बारा वर्षात जिल्हा परिषद मराठी शाळेतील गुणवत्ता मोठ्या प्रमाणात वाढली असून शासन विविध उपक्रमांच्या माध्यमातून चांगल्या योजना राबवीत आहे. शिक्षकांची गुणवत्ता एक नंबरची असून द्विपदवीधर शिक्षक असल्याने पालक वर्गाची मराठी शाळेवरील विश्वासाहर्ता वाढली असल्याने विद्यार्थी पटसंख्या वाढली आहे.**

**चित्रा वराळ**
**सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत, निघोज**

बाल गोपाळांना गोड जेवण देऊन आनंदी केल्याबद्दल सप्ताह मध्ये सहकार्य करणाऱ्या शाळा व्यवस्थापन समिती,ग्रामस्थ, पालक, विद्यार्थी शिक्षक या सर्वांचे मुख्याध्यापक कैलास शिंदे यांनी आभार व्यक्त केले तसेच मान्यवर उपस्थित व पालक यांचा सत्कार करण्यात आला. तसेच शैक्षणिक सप्ताहाची सांगता केली. यावेळी मुख्याध्यापक कैलास शिंदे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले शेवटी शिक्षक काळे यांनी आभार मानले.

# डाक चौकपाल उपक्रमांतर्गत पोखरीत महामेळावा

## पोष्ट ऑफीसच्या विविध योजनांची देणार माहीती

पोखरी : प्रतिनिधी

**भारतीय डाक विभागाच्या वतीने ३१ जुलै रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ६ यावेळेत पोखरी येथील रंगदास स्वामी मंदिरात डाक चौकपाल मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.**

पोखरी पोस्ट ऑफिस अंतर्गत येणाऱ्या म्हसोबा झाप, वारणवाडी, पोखरी तसेच इतर वाडया वस्त्यांवरील स्थानिक नागरीकांसाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून या मेळाव्यात देण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन सहाय्यक डाक अधीक्षक संदीप हदगल यांनी केले आहे.

दुरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्या संकल्पनेतून देशाच्या प्रत्येक गावातील घरामध्ये डाक विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या पोहचविण्यासाठी या अभियानाचे संपूर्ण देशात आयोजन करण्यात आले आहे. सर्व सामान्यांना सामाऊन घेणारा डाक विभाग नव्या योजना सादर करत असून या योजनाही जनतेपर्यंत पोहचविण्याचा या अभियानामगील उद्देश आहे. राज्यात सुरू असलेल्या लाडकी बहिण योजनेसाठी आधार कार्ड तसेच २०० रूपयांमध्ये पोष्ट कार्यालयात खाते उघडण्यात येणार आहे.सुकन्या समृध्दही योजनेसाठी मुलीचे तसेच आई किंवा वडीलांचे आधार कार्ड व २५० रूपयांमध्ये खाते उघडण्याची सुविधाही आहे. तसेच पोष्ट ऑफिसच्या विविध योजनांचीही यावेळी माहीती देण्यात येणार आहे.

या मेळाव्यात टाकळीढोकेश्वर सब ऑफिस अंतर्गत असणाऱ्या सर्व ब्रांच पोस्ट मास्तर मार्गदर्शन करणार असून खाते उघडण्यासाठी मदत करणार आहेत. या मेळाव्याचा पोखरी व परीसरातील नागरीकांनी लाभ घ्यावा असे अवाहन डाक विभाग व पोखरीचे पोष्ट मास्तर योगेश आंबेकर यांनी केले आहे. या मेळाव्यास वरीष्ठ डाक अधीक्षक बी नंदा, सहायक डाक अधीक्षक संदीप हदगल, पुणे क्षेत्रीय कार्यालयाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. भारतातील निवडक ५ हजार गावांमध्ये जवळा व दुर्गम पोखरी या गावाचा समावेश करण्यात आला आहे.

# क्रांतीदिनी स्वस्त धान्य दुकानदारांचे आझाद मैदानावर आंदोलन

## मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

सुपा: प्रतिनिधी

**सरकारमान्य स्वस्त धान्य संघटना महाराष्ट्र राज्याच्या वतीने आझाद मैदान या ठिकाणी क्रांती दिनी सर्व स्वस्त धान्य दुकानाच्या समस्या सोडवण्यासाठी महाराष्ट्र राज्यातून सर्व संघटनेचे पदाधिकारी आणि स्वस्त धान्य दुकानदार बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन स्वस्त धान्य दुकान संघटनेचे अध्यक्ष खंडू भुकन, सचिव रमेश गवळी यांनी केले आहे.**



यादरम्यान शासनाकडे सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानाबाबत विविध मागण्या करण्यात येणार आहेत यामध्ये स्वस्त धान्य दुकानातील ई- पॉश मशीनचे सर्व्हर तातडीने दुरुस्त करा, धान्य वितरणास मुदतवाढ द्या, गेल्या चार महिन्यांचे थकीत कमीशन द्या, धान्य ५० किलो मध्ये कटता वजा करावे आणि स्वस्त धान्य दुकानदारांना दीड रुपये किलो कमिशन दिले जाते ते तूटपूंजे असून ते परवडणारे नाही, दुप्पट कमिशन करावे यासाठी सर्व स्वस्त धान्य दुकानदारांच्या वतीने आझाद मैदान या ठिकाणी धरणे आंदोलन व धडक मोर्चा आयोजित करणार असल्याची माहिती सचिव रमेश गवळी यांनी दिली आहे.

तालुक्यात गेल्या महिनाभरापासून मोफत धान्य लाभार्थी रेशनकार्डधारकांच्या प्रत्येक सदस्याचे याच ई-पॉश मशिनवर ई- केवायसी करण्याचे आदेश आले आहेत, त्याप्रमाणे कामकाजाला सुरुवात झाली मात्र मशीनबाबत तक्रारी सुरू झाल्या.ई- केवायसी करताना अनेकदा मशीन रिस्टार्ट होत आहे अनेकदा सर्व्हर डाऊन होत आहे.लाभार्थ्यांच्या बोटाचा ठसा आला नाही तर प्रत्येक वेळी आधार क्रमांक टाकावा लागत आहे प्रत्येक्षात जेथे दुकानदार व लाभार्थी यांचा थम असतो. तेथे पासवर्डची गरज नसताना केवळ मानसिक त्रास देण्यासाठी हा पासवर्ड टाकला असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. रेशन दुकानदार दररोजच्या या अडचणींमुळे त्रस्त आहेत लाभार्थी धान्य व ई- केवायसी साठी दुकानात चकरा मारत आहेत. पर्यायाने लाभार्थी व दुकानदार यांच्यात वाद होत आहेत. ई- केवायसी व धान्यासाठी लाभार्थ्यांना आपल्या रजंदारीला मुकावे लागत आहे.

यावेळी उपाध्यक्ष भाऊसाहेब खोडदे, सदस्य दत्ता म्हस्के, संजय काळे, भागा गावडे, कृष्णा बांड, भास्कर भालेकर, प्रविण थोरात, सुभाष निघुट, मोहन परांडे आदी यावेळी उपस्थित होते.

# पिझ्झा स्टॉप कॅफेच्या उद्घाटनासाठी अश्विनी इरोळे पारनेरात!

## डीजेच्या दणदणाटात अश्विनीचे स्वागत

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर शहरात नव्यानेच सुरू झालेल्या पिझ्झा स्टॉप कॅफेच्या उद्घाटनासाठी अभिनेत्री अश्विनी इरोळे हिने पारनेर शहरात हजेरी लावली होती. डीजेच्या दणदणाटात अश्विनीचे स्वागत करण्यात आले.**

पारनेर-सुपा रस्त्यावरील परीधान कलेक्शन समोर हे कॅफे सुरू करण्यात आले असून प्रसिध्द कोरिओग्राफर तथा अभिनेत्री अश्विनी इरोळे हीस उद्घाटनासाठी आमंत्रीत करण्यात आले होते. अश्विनी हीने उपस्थितांसह या शॉपचे उद्घाटन करून व्यवसायाच्या भरभराटीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना इरोळे यांनी सांगितले की, तरूणांनी नोकरीच्या मागे न लागता आपल्या आवडीचा व्यवसाय निवडूण




**पारनेर शहरात नव्यानेच सुरू झालेल्या पिझ्झा स्टॉप कॅफेचे अभिनेत्री अश्विनी इरोळे हिच्या हस्ते उदघाटन करण्यात आले.**

त्यात करीअर करावे. महाराष्ट्रातील तरूण पिढी व्यवसायामध्ये पाऊल टाकत असून ही समाधानाची बाब आहे. कोणताही व्यवसाय करताना सचोटी, प्रामाणिकपणाची कास धरल्यास यश निश्चित असून नव्याने व्यवसाय सुरू केलेल्या तरूणांनी आपल्या व्यवसायात भरारी घेउन इतर तरूणांपुढे आदर्श निर्माण करावा असे आवाहन त्यांनी केले.

प्रसाद बोरूडे व कलाविश्व प्रोडक्शनच्या मित्रपरीवाराने एकत्र येउन हे शॉप पारनेरमध्ये सुरू केले आहे. पारनेरमधील पिझ्झा, बर्गर तसेच आईस्किीम प्रेमींसाठी हे शॉप सेवा देणार असून पहिल्याच दिवशी पारनेर मधील अनेक पिझ्झा, बर्गर, आईस्क्रीम प्रेमींनी या कॅफेस भेट देत विविध उत्पादनांचा आनंद घेतला.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com